—७१८— ७७८

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र. मप्रनि/तांशा/ए - ५६२
श्री. छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
4 था मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,
मुंबई– 400 001.

दिनांक: 21 /1/1997.

विषय: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्राबाबत शुल्क आकारणीची दर निश्चिती..

=========

## प रि प त्र क

शासन निर्णय क्रमांक इएनव्ही–1088/672/सीआर–185/का–3, दि. 18 मार्च, 1992 अन्वये संमतीपत्राच्या शुल्काची निश्चिती करण्यात आली होती. संमतीपत्राच्या शुल्कामध्ये शासन निर्णय क्रमांक आस्था (मप्रनि)/1096/प्र.क्र.23/96/का–3, दि. 2/1/1997 अनुसार सुधारणा करण्यात आली आहे. शासन निर्णयाची एक प्रत या परिपत्रकासोबत पाठविण्यात येत आहे. नवीन दराने संमतीपत्र शुल्क आकारणी करण्याबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे:–

1)संपूर्ण महाराष्ट्र राज्यात जल व हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम लागू करण्यात आलेले असल्यामुळे, संमतीपत्राचे अर्ज तसेच घातक टाकाऊ घनपदार्थांच्या विल्हेवाटीबाबतचे अर्ज एकत्रितपणे घेण्याबाबत पूर्वी सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे उद्योग उभारण्यासाठी व उद्योग सुरु करण्यासाठी संमतीपत्र शुल्काचे दर वेगवेगळे होत. हवा प्रदूषण नियंत्रण अधिनियम राज्यभर लागू नसल्याने, असे भिन्न दर पूर्वी निश्चित केलेले होते. आता संमतीपत्र शुल्क जल व हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण ) अधिनियमांद्वारे सुधारीत दराने एकत्रितपणे घ्यावयाचे आहे.

2) कारखान्यास उत्पादन चालू करण्यासाठी व उत्पादन चालू ठेवण्यासाठी संमतीपत्राचा कालावधी 1992 मधील शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे होता:–

| उद्योगांचा संवर्ग | कालावधी |
|---|---|
| तांबडा | 1 |
| नारिंगी | 2 |
| हिरवा | 3 |

1 FEB 1997

मंडळाच्या निर्णयानुसार सदर कालावधी अतिरिक्त संमतीपत्र शुल्क घेऊन, अनुक्रमे 2, 4 व 6 वर्षांचा करण्यात आलेला आहे. पाचपट संमतीपत्रशुल्क भरण्याची कारखान्याची तयारी असेल, तर सदर कालावधी अनुक्रमे 5,10 व 15 वर्षांचा देण्यासही मंडळाने मान्यता दिलेली आहे.

3) अधिक मुदतीचे संमतीपत्र देताना कारखान्याने परिपूर्ण प्रदूषण नियंत्रण व्यवस्था उभारलेली असणे आवश्यक आहे, अशी व्यवस्था उभारली नसल्यास अधिक कालावधीसाठी संमतीपत्र देण्याचे बंधन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर असणार नाही.

4) कारखाना उभारणीसाठी संमतीपत्र, कारखाना उभारणीचे काम पूर्ण होईपर्यंत वैध असते. कारखान्यात उत्पादन चालू करण्यापूर्वी पुन्हा संमतीपत्र घेणे आवश्यक आहे.

5) भांडवली गुंतवणूक: भांडवली गुंतवणुकीमध्ये जमीन, इमारत, प्लँट व मशिनरी इत्यादी यांच्या एकूण भांडवली गुंतवणूकीचा समावेश असेल. कोणताही घसारा वजा करावयाचा नाही. या बाबीतल्या नवीन गुंतवणूकीचाही समावेश भांडवली गुंतवणुकीत करावा.

6) दि. 2/1/1997 पूर्वीच्या कालावधीसाठीचा संमतीपत्र नूतनीकरणाचा अर्ज मंडळाकडे आलेला असल्यास, दि. 2/1/1997 पूर्वीच्या कालावधीसाठी पूर्वीच्या दराने संमतीपत्र शुल्क घ्यावे. दि. 2/1/1997 नंतरच्या कालावधीसाठी नवीन सुधारीत दराने संमतीपत्र शुल्क घ्यावे. उद्योग उभारणीसाठी तसेच उद्योग सुरु करण्यासाठी पहिल्यांदा संमतीपत्र ( First Consent to Operate ) घेण्यासाठी अर्ज मंडळाकडे आला असेल किंवा प्रलंबित असेल, तर नवीन दराने संमतीपत्र शुल्क गोळा करावे.

( चिं. शा. संगीतराव )
सदस्य सचिव